# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## श्रीदत्त जयंती निमित्त पीएमपीएमएल कडून दि. १२ ते १५ डिसेंबर दरम्यान श्री क्षेत्र नारायणपूर येथे जाणाऱ्या भाविकांसाठी यात्रा स्पेशल बसेसची सोय

➢ <u>पीएमपीएमएल च्या स्वारगेट मुख्य बस स्थानकावरून सुटणार यात्रा स्पेशल बसेस</u>

पीएमपीएमएल कडून श्रीदत्त जयंती निमित्ताने श्री क्षेत्र नारायणपूर या ठिकाणी जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पीएमपीएमएल च्या स्वारगेट मुख्य बस स्थानकावरून दिनांक १२/१२/२०२४ ते १५/१२/२०२४ असे चार दिवसांकरिता यात्रा स्पेशल बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

श्रीदत्त जयंती निमित्त श्री क्षेत्र नारायणपूर यात्रेसाठी एकूण ४ बसेसचे नियोजन करण्यात आले असून पीएमपीएमएल च्या स्वारगेट मुख्य बस स्थानकावरून श्री क्षेत्र नारायणपूर येथे जाणेकरिता प्रत्येकी एक तास वारंवारितेने बसेस उपलब्ध असणार आहेत. सदरच्या यात्रा स्पेशल बससेवेचा मार्ग स्वारगेट, मार्केटयार्ड, कोंढवा बु.।।, खडीमशीन चौक, बोपदेव घाट, चांबळी, सासवड मार्गे नारायणपूर असा संचलनात राहील.

स्वारगेट ते नारायणपूर पहिली बस सकाळी ०६.०० वा. तर शेवटची बस सायंकाळी ०६.०० वा. मार्गस्थ होईल. तर नारायणपूर ते स्वारगेट पहिली बस सकाळी ०८.०० वा. तर शेवटची बस रात्रौ ०८.०० वा. मार्गस्थ होईल. तरी सर्व भाविक-भक्तांनी सदर बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे.

**Sd/-**
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. १०/१२/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**Sd/-**
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.